# गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय कायदे विषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न

आष्टी दि. १४ (प्रतिनिधी): - आष्टी तालुक्यातील कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयात गांधी महाविद्यालय व राष्ट्रीय महिला आयोग भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी कायदे विषयक जन जागृती कार्यक्रम मंगळवार दि ११/०२/२०२० रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोलक संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चानोदिया तर व उद्घाटक म्हणून संस्थेचे गोकुलदास मेहेर हे होते. या कार्यक्रमाला डॉ सुधा कांकरिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर या कार्यक्रमाला अहमदनगर येथील सुप्रसिद्ध वकील प्रशांत मोरे, प्रज्ञा हेंद्रे (जोशी) तसेच आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे ास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एन एस राठी म्हणाले की, महिलांवरील अत्याचार थांबण्यासाठी समाजातील मनोवृत्ती, वेचारात दृष्टिकोनात बदल होणे आवश्यक आहे. हे बदल चांगले ंस्कार देण्याचे काम एक स्त्री व आईच करू शकते असे म्हणत ातेचे अनेक उदाहरण दिले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने 'बेटी'च्या वागतासाठी प्राचार्य राठी यांनी एक रुपया देण्याचे सर्व विद्यार्थी प्राध्यापकांना आवाहन करून सर्वानुमते तसा ठराव पास केला. ावेळी अहमदनगर येथील सुप्रसिद्ध वकील प्रशांत मोरे यांनी 'हुंडाबळी' व प्रज्ञा हेंद्रे (जोशी) यांनी 'महिलांचे होणारे मानसिक छळ' विषयी कायद्याची माहिती दिली. आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महिलांच्या सुरक्षिततेसाठी असलेले विविध कलम व माहिती देत विविध हेल्पलाईन नंबर ही दिले. महिलांवर होणारे अत्याचार कमी करण्यासाठी समाजातील नागरिकांची मानसिकतेत बदल खूप गरजेचे आहे. स्त्रीवरील अत्याचार रोखण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव हेमंतकुमार पोखरणा, योगेशकुमार भंडारी, अनिलकुमार झाडमुथ्था, कोषाध्यक्ष डॉ उमेश गांधी, संचालक बाबूशेठ भंडारी, उपप्राचार्य जे एम भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला प्रा. ए पी कटारिया, प्रा. डॉ. एस आर मगर, प्रा. एन टी गवळी, संयोजक प्रा. धनश्री मुनोत, सह संयोजक प्रा. मीरा नाथ, प्रा. डॉ अरुणा कुलकर्णी, प्रा. डॉ. सुपर्णा देशमुख, प्रा. डॉ तन्वीर काझी, टकले अनिता यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचलन प्रा धनश्री मुनोत यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ अनिल गर्जे यांनी मानले.

लोकमत

epaper.lokmat.com
औरंगाबाद, मंगळवार, दि. २३ मार्च २०२१

# खासगीकरणामुळे उच्च शिक्षण गरिबांच्या आवाक्याबाहेर

## सार्वजनिक शिक्षणाबाबत अनास्था

डॉ. प्रकाश मुंज
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतातील शिक्षण व्यवस्थेत खासगीकरणाला प्राधान्य दिले जात आहे. यामुळे भविष्यात शिक्षणाची ज्ञानगंगा केवळ श्रीमंतांच्या दारी वाहती राहण्याची आणि गरिबांना मोलमजुरी म्हणजे बिगाऱ्याचीच कामे करण्याची वेळ येणार आहे. सरकारने याबाबत वेळीच आपले धोरण न बदलल्यास शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विषमतेची दरी अधिकच रुंदावणार आहे.

शिक्षण हे राष्ट्रनिर्मितीच्या उभारणीचे प्रमुख साधन व परिवर्तनाचे माध्यम आहे. यासाठीच स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजेच १९६२ मध्ये एकूण शिक्षणाबाबत विचार करण्यासाठी नेमलेल्या कोठारी आयोगाने एकूण उत्पन्नातील सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करावी अशी शिफारस केली आहे. मात्र; त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. गेल्या दहा वर्षांत म्हणजे २०१० पासून आतापर्यंत देशभरात २६७ खासगी विद्यापीठांना मान्यता दिली आहेत. परिणामी, उच्च शिक्षणाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेष म्हणजे शैक्षणिक गुणवत्तेवर आणि

**शिक्षणाचा बोजवारा**
भाग - १



### चिंताजनक मुद्दे

- जागतिक विद्यापीठांच्या गुणवत्तेच्या यादीत पहिल्या १०० मध्ये देशातील एकही विद्यापीठ नाही.
- देशातील सुमारे ४२ टक्के विद्यापीठे, महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन नाही. शिक्षणासाठी पर्याप्त निधीचा अभाव
- सरकारी संस्था बंद करण्याचे धोरण आणि खासगीकरणाकडे सरकारचा वाढता कल. विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये अंदाजे ६५ टक्के प्राध्यापकांच्या रिक्त जागा असून, उच्च शिक्षितांच्या बेरोजगारीत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

शिक्षणातील दर्जावर सर्वच क्षेत्रांतील तज्ज्ञांबरोबरच मुख्यमंत्री, पंतप्रधान, राष्ट्रपती आणि सर्वोच्च न्यायालय आदींनी वारंवार चिंता व्यक्त केली.

सकाळ | बीड औरंगाबाद, बुधवार, १० मार्च २०२१
TODAY
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800



कडा : येथील गांधी महाविद्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य एन.एस. राठी, उपप्राचार्य जे.एम. भंडारी, प्रा.मीरा नाथ, प्रा. बोंबे आदी.

## गांधी महाविद्यालयात महिला दिन साजरा

कडा : येथील गांधी महाविद्यालयात सोमवारी (ता.८) जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एन.एस. राठी होते. तर डॉ पुनम मार्कंडे, उपप्राचार्य जे. एम. भंडारी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. मीरा नाथ यांनी केले. अध्यक्षीय समारोप डॉ. राठी यांनी केला. डॉ. पुनम मार्कंडे, उपप्रांचार्य जे. एम. भंडारी यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. अरुणा कुलकर्णी यांनी केले. आभार प्रा नवनाथ विघाते यांनी मानले.

लोकमत
शुक्रवार ५.३.२०२१

LIBRARY

# कडा येथील गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**आष्टी :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थी व युवकांकरिता गांधी महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून कडा येथील अमोलक शिक्षण संस्थेच्या एस .के गांधी महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातर्फे विद्यार्थी व युवकांकरिता पाच दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा २२ ते २६ फेब्रुवारी २०२१ या दरम्यान झूम व यूट्यूब लाईव्हद्वारा ऑनलाईन पार पडली. या कार्यशाळेस संपूर्ण देशभरातून ५४३ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

पुणे, औरंगाबाद, नागपूर, बंगळुरु, इत्यादी ठिकाणांहून मान्यवरांच्या व्याख्यानाचा विद्यार्थ्यांनी व अनेक युवकांनी लाभ घेतला 'संवाद कौशल्य, नोकरी व करिअरच्या विज्ञानातील संधी, तसेच भावनांचे उपयुक्त निराकरण' या विषयावर ही कार्यशाळा रसायनशास्त्र विभागातील माजी विद्यार्थी संघटनेतर्फे राबविण्यात आली. विद्यार्थ्यांनी संभाषण करीत असताना सहजता व सजगता बाळगावी व सुसंवादाची सवय घालून ते दररोज आचरणात आणावे असे मत डॉ महेंद्र पटवा समन्वयक यांनी मांडले. कार्यशाळेस प्रमुख वक्ते प्राचार्य बी. एच . झावरे यांनी विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यरत विविध संशोधन संस्थांची माहिती दिली. या कार्यशाळेत डॉ मीरा कुलकर्णी यांनी संवाद कौशल्य यावर व्याख्यान दिले. तसेच डॉ आरती शनवारे यांनी बायो फर्टिलायझर व बायोपेस्टिसाईड यावर आधारित नैसर्गिक शेतीमध्ये युवकांनी कार्य करावे असे विवेचन आपल्या व्याख्यानातून केले.

डॉ. अभिजीत मंचरकर यांनी नेतृत्व विकास तर डॉ. प्रीतम बेदरकर यांनी करिअरमधील उत्कृष्ट संधी यावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी राजेश चंचलानी यांनी संवाद कौशल्यासोबत संवाद व आत्मपरीक्षण ही काळाची गरज आहे असे सांगत व प्रात्यक्षिके घेऊन युवकांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी युवकांनी आपले भविष्य घडवत असताना प्रामाणिक कष्ट करावेत व या कार्यशाळेतून लाभलेल्या उपयुक्त विचारांना अंगीकृत करावेत असे प्रतिपादन केले. या कार्यशाळेचे संयोजन, प्रा.डॉ. सुवर्णा देशमुख, रसायनशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले. प्रा सोमनाथ हासे यांनी तांत्रिक बाजू सांभाळली.

LIBRARY

झुंजार नेता

दिनांक : २ मार्च २०२१ • वार: मंगळवार • पान ३

# राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त गांधी महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

कडा दि.१ (वार्ताहर):- कडा येथील गांधी महाविद्यालयात राष्टीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून रसायनशास्त्र विभागाच्यावतीने विद्यार्थी व युवकांकरीता पाच दिवसीय राष्टीय स्तरावरील कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली.दिनांक २२ ते २६ फेब्रूवारी २०२१ या दरम्यान झूम व यूट्यूब लाईव्ह द्वारा ऑनलाईन संपन्न झालेल्या या कार्यशाळेस संपूर्ण देशभरातून ५४३ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. पुणे, औरंगाबाद,नागपूर,बंगलोर इत्यादी ठिकाणांहून मान्यवरांच्या व्याख्या नाचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला संवाद कौशल्य, नोकरी व करिअरच्या विज्ञानातील संधी, तसेच भावनांचे उपयुक्त निराकरण या विषयावर ही कार्यशाळा रसायनशास्त्र विभागातील माजी विद्यार्थी संघटनेतर्फे राबविण्यात आली.

विद्यार्थ्यांनी संभाषण करीत असताना सहजता व सजगता बाळगावी व सुसंवादाची सवय घालून ते दररोज आचरणात आणावे असे मत अमोलक संस्थेचे समन्वयक डॉ. महेंद्र पटवा यांनी उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले. न्यू आर्ट्स कॉमर्स व सायन्स कॉलेजचे प्राचार्य बी. एच . झावरे अहमदनगर यांनी विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना राष्टीय व आंतरराष्टीय स्तरावरील कार्यरत विविध संशोधन संस्थांची माहिती दिली. विविध स्पर्धा परीक्षा, अनेक प्रकारच्या फेलोशिप , समर रिसर्च फेलोशीप तसेच संशोधन करिता अनेक संधी उलगडत , विज्ञानातील संशोधन ही भारताच्या विकास करिता आज काळाची गरज बनली असून विद्यार्थ्यांनी संशोधनावर भर द्यावा असे सांगितले. यावेळी डॉ. मीरा कुलकर्णी, डॉ. आरती शनवारे,डॉ. अभिजीत मंचरकर, उपप्राचार्य डॉ ज. मो. भंडारी, डॉ. प्रीतम बेदरकर, श्री जयंत भोळे, राजेश चंचलानी यांनी आपापले विचार मांडले. कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी युवकांनी आपले भविष्य घडवत असताना प्रामाणिक कष्ट करावेत असे सांगितले. कार्यशाळेचे संयोजन प्रा. सुपर्णा देशमुख यांनी केले.

दैनिक दिव्य मराठी

दिव्य मराठी, मंगळवार, २ मार्च २०२१

LIBRARY

# विज्ञानदिनी कार्यशाळा; ५४३ विद्यार्थी सहभागी

प्रतिनिधी | कडा

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थी व युवकांकरिता कडा शहरातील गांधी महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत ठिकठिकाणच्या ५४३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

अमोलक शिक्षण संस्थेच्या एस .के .गांधी महाविद्यालयाच्या रसायन शास्त्र विभाग तर्फे विद्यार्थी व युवकांकरीता पाच दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा २२ ते २६ फेब्रुवारी २०२१ या दरम्यान पार पडली. पुणे, औरंगाबाद, नागपूर, बंगलोर इत्यादी ठिकाणांहून विविध विषय तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांनी व युवकांनी लाभ घेतला. 'संवाद कौशल्य, नोकरी व करिअरच्या विज्ञानातील संधी, तसेच भावनांचे उपयुक्त निराकरण' या विषयावर ही कार्यशाळा रसायनशास्त्र विभागातील माजी विद्यार्थी संघटनेतर्फे राबविण्यात आली. विद्यार्थ्यांनी संभाषण करीत असताना सहजता व सजगता बाळगावी व सुसंवादाची सवय घालून ते दररोज आचरणात आणावे, असे मत मंडळाचे समन्वयक डॉ.महेंद्र पटवा यांनी मांडले. प्राचार्य बी.एच. झावरे यांनी विविध संशोधन संस्थांची माहिती दिली. या कार्यशाळेत डॉ.मीरा कुलकर्णी यांनी संवाद कौशल्य यावर व्याख्यान दिले. तसेच राजीव गांधी बायोटेकचे संचालक डॉ.आरती शनवारे यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अभिजीत मंचरकर, डॉ. प्रीतम बेदरकर, जयंत भोळे यांच्यासह इतर मान्यवरांनीही मार्गदर्शन केले.

झुंजार नेता

• दिनांक : ६ फेब्रुवारी २०२१ • वार : शनिवार

LIBRARY

# रविवारी देवळाली येथे डाळींब पिकांवर परिसंवाद

कडा, दि.५ (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील देवळाली पानाची येथे रविवार दिनांक ७ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता डाळींब रत्न पुरस्कार प्राप्त बाबासाहेब गोरे यांचे डाळींब पिकांवर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

आष्टी तालुका हा दुष्काळी भाग आहे. या परिसरातील पाण्याचे प्रमाण अल्प आहे त्यामुळे कमी पाण्यावर आणि ठिबक पद्धतीने शेती करण्याकडे शेतकऱ्यांचा मोठा कल आहे. फळबाग लागवड मोठ्या प्रमाणात झालेली आहे. आष्टी तालुक्यातील देवळाली ग्रामपंचायत आणि कडा येथील गांधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरातील शेतकऱ्यांसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञान अंतर्गत डाळींब पिकाविषयी सविस्तर माहिती या परिसंवादात देण्यात येणार आहे. आष्टी तालुका कृषी अधिकारी राजेंद्र ►►पान २ वर

उपस्थित होते.

## रविवारी देवळाली येथे डाळींब पिकांवर ....

सुपेकर हे देखील यावेळी मार्गदर्शन करणार आहेत.

कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर सामाजिक आंतर ठेवुन हा कार्यक्रम होत आहे. प्रत्येकाने मास्क लावुन कार्यक्रमास उपस्थित रहावे. चैतन्य स्वामी मंदीराचे समोर होणाऱ्या कार्यक्रमास परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

झुंजार नेता
दिनांक : ९ फेब्रुवारी २०२१ • वार: मंगळवार• पान ३

# देवळाली (पानाची) येथे डाळींब पिक परिसंवादात बाबासाहेब गोरे, राजेंद्र सुपेकर यांचे मार्गदर्शन

कडा,दि.८(प्रतिनिधी): आष्टी तालुक्यातील देवळाली ( पानाची ) येथे डाळींब पिक परिसंवाद कार्यक्रम संपन्न झाला यामध्ये महाराष्ट्र शासनाचा 'डाळींब रत्न' पुरस्कार प्राप्त बाबासाहेब गोरे व आष्टी तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

कडा येथील श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय व ग्रामपंचायत देवळाली (पानाची ) यांच्या संयुक्त विद्यमाने 'डाळींब पिक परिसंवाद या कार्यक्रमाचे आयोजन देवळाली येथे करण्यात आले. हा पर्यावरण पुरक उपक्रम महाविदयालयाने अंगीकृत करण्यासाठी श्री अमोलक जैन विदया प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कांतीलाल चाणोदिया, विश्वस्त अध्यक्ष गोकुळदास मेहेर, कार्याध्यक्ष योगेशकुमार भंडारी, सचिव हेमंतकुमार पोखरणा, उपाध्यक्ष रमेशलाल गुगळे व अनिलकुमार झाडमुथ्था ,मंत्री बिपीनकुमार भंडारी, विनोद बलदोटा,



कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी तसेच सर्व पदाधिकारी, सदस्य, विश्वस्त व कार्यकारी मंडळांनी प्रोत्साहन दिले . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोलक संस्थेचे कांतीलाल चाणोदिया व विश्वस्त उपाध्यक्ष बाबुलाल भंडारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एस.राठी, उपप्राचार्य डॉ.जे. एम. भंडारी, पंचायत समिती सदस्य परमेश्वरकाका शेळके, सरपंच बबनराव तळेकर उपस्थित होते.

यावेळी बाबासाहेब गोरे यांनी डाळींब पिक व्यवस्थापन हे शास्त्रीय पध्दतीने कसे करावे या विषयी विस्तृत मार्गदर्शन केले. या पिकाच्या वेगवेगळया अवस्थेमध्ये वापरण्यासाठी सेंद्रीय औषधांचे उपयोग सांगितले. तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांनी शासनाच्या विविध कृषि योजनांची माहिती देवून मृदा व जलपरिक्षण काळाची गरज असल्याचे सांगितले. बाबुलाल भंडारी यांनी श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ ही संस्था सन २०२४ मध्ये शतक महोत्सवात पदार्पण करणारी जिल्हयातील एकमेव जैन अल्पसंख्यांक संस्था असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्रा. डॉ. विशाल वैद्य यांनी सेंद्रीय शेती, गांडूळ खत प्रकल्प, सुधारित बियाणे तंत्रज्ञान, एकात्मिक कीड नियोजन याविषयी माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी अध्यक्षीय समारोप करतांना वसुंधरा संवर्धन काळाची गरज या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले तसेच सामाजिक अंतर ठेवून महाविद्यालयाकडून शेतकऱ्यांना मास्क व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. चंद्रशेखर तळेकर, प्रा. डॉ. रमेश आबदार, अशोक खाडे, प्रा. गवळी एन. टी, प्रा. डॉ. जाधवर पी. बी., प्रा. हासे एस. आर व प्रा. डॉ. शिंदे एस.एम. यानी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. सुदाम जाधव यांनी व उपस्थितांचे आभार सुनिल खाडे यांनी मानले.महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व पंचक्रोषीतील शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

# देवळालीत डाळिंब पिकाबाबत परिसंवादाद्वारे मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कडा :** आष्टी तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय व ग्रामपंचायत देवळाली (पानाची) यांच्या संयुक्त विद्यमाने डाळिंब पीक परिसंवादात, महाराष्ट्र शासनाचा 'डाळिंब रत्न' पुरस्कारप्राप्त बाबासाहेब गोरे व आष्टी तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

अध्यक्षस्थानी कांतीलाल चाणोदिया व विश्वस्त उपाध्यक्ष बाबूलाल भंडारी उपस्थित होते. प्राचार्य डॉ.एन.एस.राठी, उपप्राचार्य डॉ.जे. एम. भंडारी, पंचायत समिती सदस्य परमेश्वर शेळके, सरपंच बबनराव तळेकर उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा. डॉ. विशाल वैद्य यांनी सेंद्रिय शेती, गांडूळ खत प्रकल्प, सुधारित बियाणे तंत्रज्ञान, एकात्मिक कीड नियोजनाविषयी माहिती दिली. प्राचार्य डॉ.नंदकुमार



कडा येथील गांधी महाविद्यालयात बाबासाहेब गोरे यांनी मार्गदर्शन केले.

## मृदा, जल परीक्षण काळाची गरज

- यावेळी बाबासाहेब गोरे यांनी शास्त्रीय पद्धतीने डाळिंब पीक व्यवस्थापनावर मार्गदर्शन करून सेंद्रिय औषधांचे उपयोग सांगितले. तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांनी शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती दिली.
- मृदा व जल परीक्षण काळाची गरज असल्याचे ते म्हणाले. बाबूलाल भंडारी यांनी श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ येत्या तीन वर्षात शतक महोत्सवात पदार्पण करणारी जिल्ह्यातील एकमेव जैन अल्पसंख्यांक संस्था असल्याचे सांगितले.

राठी यांनी वसुंधरा संवर्धन काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी मास्क व गुलाब पुष्प देऊन शेतकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. चंद्रशेखर तळेकर, प्रा. डॉ. रमेश आबदार, अशोक खाडे, प्रा.गवळी एन.टी, प्रा.डॉ. जाधवर पी. बी., प्रा. हासे एस.आर व प्रा.डॉ. शिंदे एस.एम. यांनी परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुदाम जाधव यांनी केले. सुनील खाडे यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा पर्यावरणपूरक उपक्रम महाविद्यालयाने अंगीकृत करण्यासाठी श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कांतीलाल चाणोदिया, विश्वस्त अध्यक्ष गोकुळदास मेहेर, कार्याध्यक्ष योगेशकुमार भंडारी, सचिव हेमंतकुमार पोखरणा, उपाध्यक्ष रमेशलाल गुगळे व अनिलकुमार झाडमुथ्था, मंत्री बिपीनकुमार भंडारी, विनोद बलदोटा, कोषाध्यक्ष डॉ.उमेश गांधी, तसेच सर्व पदाधिकारी, सदस्य, विश्वस्त व कार्यकारी मंडळांनी प्रोत्साहन दिले.

# कोव्हीडमुळे उद्योगावर झालेले परिणाम शनिवारी राष्ट्रीय चर्चासत्र

कडा दि.११ ( वार्ताहर ):- कोव्हीड १९ मुळे उद्योग क्षेत्रावर झालेले परिणाम या विषयावर शनिवारी दिनांक १३ फेब्रुवारी रोजी कडा येथील गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले आहे या वेबीनारचे उद्घाटन कुलगुरू डॉ शाम सिरसाठ यांच्या हस्ते होणार आहे अशी माहिती प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी दिली. याबाबत अधिक माहिती अशी की, कोव्हीड १९ मुळे जगातील प्रत्येक व्यावसायावर मोठा परिणाम झाला आहे.

यावर आधारित राष्ट्रीय वेबीनार कडा येथे होत आहे. यावेळी प्रमुख पाहुणे अमोलक जैन शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाचे डॉ. वाल्मिक सरवदे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनिल नरवडे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ सईद अजरुद्दीन यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या वेबिनारचा लाभ घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ राठी, उपप्राचार्य डॉ भंडारी, डॉ. अशोक कोरडे, डॉ मदन मार्कंडे, डॉ मिरा नाथ, डॉ नरेंद्र गवळी, डॉ शेळके, प्रा संकेत गांधी, प्रा गोरक्षनाथ शिंदे, प्रा सोमनाथ हासे, प्रा. वाघुले यांनी केले आहे.

# कोविडचा उद्योगांवर परिणाम; कडा येथे शनिवारी चर्चासत्र

प्रतिनिधी। कडा

दि.११ : कोविडचा उद्योग क्षेत्रावर झालेले परिणाम या विषयावर आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय वेबीनारचे शनिवारी आयोजन करण्यात आले आहे. या वेबीनारचे उद्घाटन कुलगुरू डॉ.शाम सिरसाट यांच्या हस्ते होणार आहे अशी माहिती प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी यांनी दिली.

कोरोनामुळे जगातील प्रत्येक व्यावसायावर मोठा परिणाम झाला आहे. यावर आधारित राष्ट्रीय वेबीनार कडा येथे होत आहे. यावेळी प्रमुख पाहूणे अमोलक जैन शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाचे आधिष्ठाता डॉ.वाल्मिक सरवदे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.सुनिल नरवडे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.सईद अजरुद्दीन यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या वेबिनारचा लाभ घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.राठी, उपप्राचार्य डॉ.भंडारी, डॉ. अशोक कोरडे, डॉ.मदन मार्कंडे, डॉ.मिना नाथ, डॉ. नरेंद्र गवळी, डॉ.शेळके, प्रासंकेत गांधी, प्रा.गोरक्षनाथ शिंदे, प्रा.सोमनाथ हासे, प्रा.वाघुले यांनी केले आहे.

# कोव्हीडमुळे उद्योगावर झालेले परिणाम या विषयावर आज चर्चासत्र

कडा, दि.१२ (प्रतिनिधी):- कोव्हीड १९ मुळे उद्योग क्षेत्रावर झालेले परिणाम या विषयावर शनिवारी दिनांक १३ फेब्रुवारी रोजी कडा येथील गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय वेबीनारचे आयोजन करण्यात आले आहे या वेबीनारचे उद्घाटन कुलगुरू डॉ शाम सिरसाठ यांच्या हस्ते होणार आहे अशी माहिती प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती अशी की, कोव्हीड १९ मुळे जगातील प्रत्येक व्यावसायावर मोठा परिणाम झाला आहे. यावर आधारित राष्ट्रीय वेबीनार कडा येथे होत आहे. यावेळी प्रमुख पाहुणे अमोलक जैन शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाचे डॉ. वाल्मिक सरवदे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनिल नरवडे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ सईद अजरुद्दीन यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या वेबिनारचा लाभ घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ राठी, उपप्राचार्य डॉ भंडारी, डॉ. अशोक कोरडे, डॉ मदन मार्कंडे, डॉ मिरा नाथ, डॉ नरेंद्र गवळी, डॉ शेळके, प्रा संकेत गांधी, प्रा गोरक्षनाथ शिंदे, प्रा सोमनाथ हासे, प्रा. वाघुले यांनी केले आहे.

लोकमत
ebaper.lokmat.com 3
औरंगाबाद, गुरुवार, दि. २४ फेब्रुवारी २०२२

अभिवादन

जयंती वि...



# गांधी महाविद्यालयात जयंती कार्यक्रम

**आष्टी :** गांधी महाविद्यालय कडा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. अनिल गर्जे. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. नवनाथ विधाते, डॉ. गोंदकर, डॉ. अशोक कोरडे, डॉ. पांडुरंग अनारसे यांनी गाडगेबाबांचे जीवन व कार्य, ग्रामस्वच्छता याविषयी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनारसे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. नवनाथ विधाते यांनी केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक. व सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉ. गव्हाणे. डॉ. मगर. डॉ. भोसले. प्रा. सुनीता बोंबे. टकले. प्रा. सय्यद. डॉ. चौधरी हे उपस्थित होते.

आष्टी / कडा : १२ जानेवारी रोजी गांधी महाविद्यालय कडा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी हे होते.



यावेळी डॉ. राठी म्हणाले की, जीवनामध्ये संकटे येत असतात, त्याला समर्थपणे सामोरे जाणे, यातच खरा पुरुषार्थ आहे. ही विवेकानंदांची शिकवण सर्वांनी आचरणात आणल्यास संकटांना सामोरे जाणे सहज शक्य आहे. राजमाता जिजाऊ यांनी दुसऱ्याच्या दरबारी गुलामी करण्यापेक्षा आपले स्वतःचे राज्य निर्माण केले.. या शिकवणीतूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. आजच्या युवकांनी हा आदर्श समोर ठेवून स्वतःचे उद्योग व्यवसाय काढून इतरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीयसेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.नवनाथ विधाते यांनी केले, तर आभार प्रा.नरेंद्र गवळी यांनी व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गांधी महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी



आष्टी (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी हे होते.यावेळी अध्यक्ष व मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन व प्रतिमा पुजन करण्यात आले.यावेळी प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी बोलताना ते म्हणालेकी, जीवनमध्ये संकटे येत असतात त्याला समर्थपणे सामोरे जाने यातच खरा पुरुषार्थ आहे. हि विवेकानंदांची शिकवण सर्वांनी आचरणात आनल्यास संकटांना सामोरे जाने सहज शक्य आहे.राजमाता जिजाऊ यांनी दुसऱ्याच्या दरबारी गुलामी करण्यापेक्षा आपले स्वतःचे राज्य निर्माण केले पाहिजे. या शिकवणीतूनच छ. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. आजच्या युवकांनी हा आदर्श समोर ठेवून स्वतःचे उद्योग व्यावसाय काढून इतरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डा.नवनाथ विघावे तर आभार प्रा.नरेंद्र गवळी यांनी मानले. यावेळी महाविद्यालयचे उपप्राचार्य डॉ.ज.मो. भंडारी,प्रा.मिरा नाथ सर्व विद्यार्थी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कडा येथील गांधी महाविद्यालयात हुतात्मा दिन साजरा

आष्टी, सी.३० (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयात दि. ३० जानेवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने राष्ट्रीय हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी म.गांधी. भगतसिंग,राजगुरू,सुखदेव यांनी बलिदान दिले.याप्रसंगी महाविद्यालयाच्या व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आदरांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. अनिल



गर्जे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. नवनाथ विधाते, डॉ. अशोक कोरडे,डॉ. तुकाराम गोंदकर,डॉ.अरूणा कुलकर्णी, महाविद्यालयीचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

झुंजार नेता

दिनांक : १९ डिसेंबर २०२१ • वार : रविवार • पान३

# गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

आष्टी दि.१८ (प्रतिनिधीं) - आष्टी तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय पदार्थविज्ञान विभाग आणि पेटेंट ऑफिस मुंबईयांच्या संयुक्त विद्यमाने बोद्धीक मालमत्ता अधिकार या विषयावर एकदिवसीय राष्टीय कार्यशाळेचे आभासी माध्यमाद्वारे १५ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले होते. या राष्टीय कार्यशाळेत देशातील १० राज्यातून २९५ प्राध्यापक सहभागी झाले होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक उपप्राचार्य व पदार्थविज्ञान विभागाचे डॉ.जवाहर भंडारी यांनी केले. ही राष्टीय कार्यशाळा आयोजित करण्याचा हेतु, केंद्रशासन पुरस्कृत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त देशातील संशोधकांना संशोधनासाठी प्रेरणा मिळावी त्यांनी केलेला संशोधन किती महत्वाचे व समाजासाठी उपयुक्त आहे याची समाजात जाणिव जाग्राती



निर्माण व्हावी असा होता.या राष्टीय कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल चाणोदिया, सेक्रेटरी हेमंतकुमार पोखरणां,कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी यांनी केले. यावेळी डॉ.संजय चाकणे, डॉ.अजय ठाकूर ऑनलाइन उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी यांनी यांनी भुषविले. उद्घाटनप्रसंगी बोलताना हेमंतकुमार पोखरणा यांनी बौद्धिक मालमत्ता अधिकार याचे महत्त्व विषद केले.डॉ.उमेश गांधी यांनी याचा महाविद्यालयापासून अंगीकार कसा करता येईल याचा विचार विद्यार्थ्यांनी करावा हवा असे.यावेळी बोलताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात परिषदेचे विद्या परिषदेचे सदस्य व इंदापूर महाविद्यालयाचे प्राचार्य संजय चाकणे यांनी मूलभूत संशोधन पद्धती स्पष्ट करून त्यांचे पेटंट मध्ये रूपांतर करण्याच्या पद्धती. तसेच बौद्धिक मालमत्ता अधिकाऱ्यांची मूलभूत, पद्धती व विनियोग याबद्दल व या अंतर्गत सात निकषां बद्दल व रोजंच्या व्यवहारातील उदाहरणे देऊन संकल्पना,भारत सरकार पेटंट विभाग मुंबई चे अतिरिक्त नियंत्रक डॉ.अजय ठाकूर यांनी स्पष्ट केली.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य नंदकुमार राठी यांनी विविध उदाहरणे देऊन बौद्धिक मालमत्ता हक्क या संदर्भात उपयुक्त माहिती दिली. कार्यक्रमासाठी प्रा.डॉ.योगेश रसाळ, प्रा. सोमनाथ हसे, प्रा.नवनाथ कराळे, प्रा.डॉ. विशाल वैद्य, प्रा.डॉ.सुदाम जाधव, प्रा.डॉ. राधाकृष्ण जोशी,प्रा.धनश्री मुनोत, डॉ. अमोल कल्याणकर,प्रा.शिवाजी जगदाळे व इतरांचे सहकार्य लाभले प्रा.डॉ.योगेश रसाळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर उपस्थितांचे आभार प्रा.नरेंद्र गवळी यांनी मानले.

लोकमत
शुक्रवार २५.१२.२०२०
हॅलो बीड
epaper.lokmat.com

LIBRARY



## गांधी महाविद्यालयात साने गुरुजी जयंती

**आष्टी :** कडा येथील गांधी महाविद्यालयात रासेयो विभागामार्फत साने गुरुजी जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. मान्यवरांनी साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी रासेयोच्या विद्यार्थ्यांनी स्फूर्तिगीत सादर केले. या कार्यक्रमात रासेयोमार्फत एन-९५ मास्कचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. नवनाथ विधाते, सूत्रसंचालन प्रा. डॉ. उद्धव चव्हाण यांनी केले. प्रा. तुकाराम गोंदकर यांनी आभार मानले. उपप्राचार्य डॉ. ज मो. भंडारी, प्रा. योगेश रसाळ, प्रा. मीरा नाथ, डॉ. राजकुमार थोरवे, डॉ. अनारसे व सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रक्रिया यंत्रणेची गरज

## गतिरोधकाची गरज

# साने गुरुजी जयंतीनिमित्त कडा येथील गांधी महाविद्यालयात मास्क वाटप



आष्टी, दि. २५ (प्रतिनिधी) दि. २४ डिसेंबर रोजी कडा येथील गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत साने गुरुजी जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी हे होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते साने गुरुजींच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी यास्फूर्तीदायक गीतानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी साने गुरुजी यांच्या कार्याचा जीवनपट सविस्तरपणे कथन केला.

या कार्यक्रमामधे सुरक्षीत आंतर ठेवून विद्यार्थ्यांना व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत एन ९५ मास्क वाटप करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ज. मो. भंडारी, प्रा. योगेश रसाळ, प्रा. मिरा नाथ, डॉ. राजकुमार थोरवे, डॉ. अनारसे व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. नवनाथ विधाते तर सुत्रसंचलन प्रा. डॉ. उध्दव चव्हाण यांनी केले. प्रा. तुकाराम गोंदकर यांनी आभार व्यक्त केले.

LIBRARY

लोकमत
बुधवार १६.१२.२०२०
हॅलो बीड
epaper.lokmat.com

## जैन मुनी प्रवीणऋषी आज कड्यात



कडा : जैन मुनी प्रवीणऋषी आणि तीर्थेशऋषी यांचे १६ डिसेंबर रोजी कडा येथे आगमन होत आहे. येथे बाबूलाल पोखरणा यांच्या निवासस्थानी त्यांचे दोन दिवस वास्तव्य राहणार आहे. जैन स्थानकात व्याख्यान व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. गुरुवारी अमोलक जैन संस्थेला ते भेट देणार असून तेथे व्याख्यान होणार आहे. तीर्थेश ऋषी या संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. सोशल डिस्टन्सचे पालन करीत सहभागी होण्याचे आवाहन वर्धमान जैन श्रावक संघाने केले आहे.

# झुंजार नेता

दिनांक : २८ नोव्हेंबर २०२० • वार: शनिवार• पान ३


## गांधी महाविद्यालयात संविधान दिन साजरा

आष्टी (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयात दि.२६ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभागामार्फत भारतीय संविधान दिन आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी हे होते. यावेळी संविधान प्रतिमा पुजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.नवनाथ विधाते यांनी केले. प्रा.डॉ.उध्दव चव्हाण यांनी संविधान वाचन व संविधानची शपथ दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी होते. ते यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले की, भारत हा विविध धर्म व जाती असलेला विशाल असा खंडप्राय देश आहे. त्यामुळे



डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व समावेशक असे संविधान देशाला दिले. संविधानामूळेच देशाचा राज्यकारभार सुरळीत सुरु आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले संविधान हे देशालाच नव्हे तर जगाला मिळालेली एक देणगी आहे.२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा.डा.तुकाराम गोंदकर यांनी केले तर आभार प्रा.डॉ.चंद्रशेखर तळेकर यांनी मानले. याप्रसंगी प्रा. नरेंद्र गवळी.प्रा.डॉ.राजकुमार थोरवे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.कराळे, प्रा. कल्याणकर प्रा.अनारसे व प्राध्यापिका मिरा नाथ यांनी परिश्रम घेतले. यावेळी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सकाळ | लातूर-उस्मानाबाद-बीड औरंगाबाद, सोमवार, १९ ऑक्टोबर २०२०
TODAY
f SakalNews | @esakalupdate | www.esakal.com Call Center : 9225800800

LIBRARY




आष्टी : तालुक्यातील कडा येथील गांधी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

## गांधी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन

**आष्टी :** तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या गांधी महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातर्फे मिसाईल मॅन तथा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उच्च शिक्षण विभाग, औरंगाबादचे सहसंचालक प्रा. डॉ. दिगंबर गायकवाड उपस्थित होते. प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी व प्रमुख पाहुणे औरंगाबाद विभागाचे सहसंचालक प्रा. डॉ. दिगंबर गायकवाड यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष, कांतिलाल चानोदिया, सचिव हेमंत पोखरणा, उपप्राचार्य डॉ. ज. मो. भंडारी, ग्रंथपाल डॉ. राजकुमार थोरवे आदी उपस्थित होते.

# कडा येथील गांधी महाविद्यालयात कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा



**आष्टी** | कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या गांधी महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्या वतीने मिसाईल मॅन तथा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उच्च शिक्षण विभाग, औरंगाबादचे सह संचालक प्रा.डॉ.दिगंबर गायकवाड उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी होते. प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. राजकुमार थोरवे यांनी केले. या वेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी हजर होते.

# निधन वार्ता

## शशिकलाबाई गायकवाड

**केज** | तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहिवासी



शशिकलाबाई किसनराव गायकवाड यांचे अल्पशा आजाराने स्वाराती रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७२ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर चिंचोली माळी येथे शुक्रवारी (ता.१६ ऑक्टोबर) अंत्यसंस्कार करण्यात आले. पत्रकार लक्ष्मण गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत.

# झुंजार नेता

सोमवार दि. १९ ऑक्टोबर ■ R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/29/RNP/


## गांधी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम संपन्न

कडा, दि. १८ (प्रतिनिधी) - कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या गांधी महाविद्यालयांमध्ये मिसाईल मॅन तथा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात आली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक प्रा. डॉ. दिगंबर गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी हे होते. या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



यावेळी सहसंचालक डॉ. गायकवाड यांनी वाचन प्रेरणा दिना विषयी सांगितले की, वाचन केल्याने माणूस कोणत्याही मोठ्या पदापर्यंत जाऊ शकतो, जीवनात कसे यश मिळतेअसा मोलाचा संदेश त्यांनी दिला. उपप्राचार्य डॉ. जवाहर भंडारी यांनी आपल्या भाषणात वाचाल तर वाचाल हा मोलाचा संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात डॉ. नंदकुमार राठी यांनी ग्रांथालये किती मोलाची आहेत. वाचनाने विचार सुधारते आणि असे सुधारलेले विचार कोठेही झुकत नाही त्यासाठी सर्वांनी किमान एक तास तरी वाचनासाठी दिला पाहिजे. या वेळीं महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सामाजिक अंतराचे पालन करुन कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स
सोमवार, २७ जुलै २०२०

# संवादसत्राने उलगडले संधीचे द्वार

- मटा कल्चरल क्लब, स्मिता इन्व्हेस्टमेंट, हॉलिडेजचा उपक्रम
- कोविड १९नंतरच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे

महाराष्ट्र टाइम्स CULTURE Club









म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

आज प्रत्येकजण करोना संसर्गावरच चर्चा करत असल्याचे पाहायला मिळत असताना शनिवारी (२५ जुलै) सायंकाळी 'मटा कल्चर क्लब', 'स्मिता इन्व्हेस्टमेंट आणि स्मिता हॉलिडेजच्या फेसबुक लाइव्ह संवादसत्रातून अनेकांना येणाऱ्या काळात करावयाच्या गुंतवणूक आणि आगामी हॉलिडे टूरविषयक प्लॅनिंगसाठी प्रेरणा मिळाली. स्मिता इन्व्हेस्टमेंटच्या संचालिका स्वाती जोशी व स्मिता हॉलिडेजच्या संचालिका प्रज्ञा गोरे यांनी आगामी काळातील संधीविषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे स्मिता इन्व्हेस्टमेंट आणि हॉलिडेज ग्रुपचे संचालक जयंत गोरे यांनी अत्यंत साध्या भाषेत दोन्ही संचालिकांकडून सर्वसामान्य नागरिक म्हणून पडणाऱ्या विविध प्रश्नांची उत्तरे मिळवली.

या फेसबुक लाइव्हला मोठ्या प्रमाणावर लाइक्स व कॉमेंट्स मिळाल्या. कोविड १९ अर्थात करोना संसर्गकाळात प्रत्येक व्यक्ती चिंतेत असला तरी येणाऱ्या काळात आपली गुंतवणूक कशी असायला हवी, कोणकोणत्या गोष्टींची काळजी घेत गुंतवणूक करावी यासह पुढील काळातील हॉलिडे टूर कसे असावे, कोणकोणत्या बाबी लक्षात घेतल्या जाव्या जेणेकरून आपला टूर अधिक सुरक्षित मानला जाईल या मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यासाठी महाराष्ट्र टाइम्स कल्चरल क्लबच्या पुढाकाराने व स्मिता इन्व्हेस्टमेंट आणि स्मिता हॉलिडेजच्या संयुक्त विद्यमाने फेसबुक लाइव्हचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्मिता इन्व्हेस्टमेंटच्या संचालिका स्वाती जोशी व स्मिता हॉलिडेजच्या संचालिका प्रज्ञा गोरे यांनी सर्वांशी संवाद साधत विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

या फेसबुक लाइव्हमध्ये स्मिता इन्व्हेस्टमेंटच्या संचालिका स्वाती जोशी या कोविड १९ नंतरच्या इन्व्हेस्टमेंटच्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश टाकला. सेक्युरिटी, लिक्विडीटी व ग्रोथ या मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. इन्व्हेस्टमेंट करताना सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे आपले डॉक्युमेंटेशन. जसे की मोबाइल नंबर, ईमेल आयडी योग्य असायला हवा. कारण सर्व प्रकारचे बदल, नवीन अपडेट यावर येणे अपेक्षित असते. ते चुकीचे असले तर योग्य वेळी महत्त्वाची माहिती मिळणार नाही. त्यामुळे वेळच्या वेळी या गोष्टी अपडेट कराव्या व त्या अपडेट झाल्या की नाही याची खातरजमा करावी. गुंतवणूक ही सातत्यपूर्ण असायला हवी. गुंतवणूक करताना उद्दिष्ट निश्चित करणे सुद्धा तितकेच महत्त्वाचे असते. गुंतवणुकीतून मिळणारा मोबदला अर्थात फायदा, मिळणारे व्याज यावर विशेष लक्ष देणे गरजेचे असते. पारंपरिक गुंतवणूक जसे की एफडी, एलआयसी, आरडी, सेव्हिंग, सोने खरेदी याबरोबरच अशा कोणत्या इन्व्हेस्टमेंट आहेत ज्यामध्ये महागाईदरापेक्षा जास्त ग्रोथ कशी मिळवावी यावरही त्यांनी मार्गदर्शन केले. इन्व्हेस्टमेंट करताना आपण बँक कन्सल्टन्ट आपल्या ओळखीचा आहे म्हणून बऱ्याच इन्व्हेस्ट करायला तयार होतो. परंतु, घाईघाईत गरज नसलेले अर्थात फारसे बेनिफिट न मिळवून देणारे प्रोडक्ट अर्थात इन्व्हेस्टमेंट स्कीम खरेदी करून घेतो. त्यावेळी इन्व्हेस्टमेंट प्लॅनिंग, फॅमिली बँकग्राऊंड, पेपरलेस, ऑनलाइन यासारख्या बार्बीवर लक्ष दिले जाणे अत्यंत महत्त्वाचे असते, या मुद्द्यांवर स्मिता इन्व्हेस्टमेंटच्या संचालिका स्वाती जोशी यांनी संवाद साधला.

सर्टिफाइड फायनान्शियल कन्सल्टंट आपल्याला आर्थिक नुकसानीपासून वाचवू शकतो हे सर्वांनी आवर्जून लक्षात घेण्याचे स्मिता इन्व्हेस्टमेंटच्या वतीने सांगण्यात आले.

## 'सिस्टमॅटिक हॉलिडे प्लॅन'

स्मिता हॉलिडेजच्या संचालिका प्रज्ञा गोरे यांनी कोविड १९ नंतरच्या हॉलिडेज टूरविषयी संवाद साधला. प्रत्येकजण आपण एकदा का होईना 'फॉरिन टूर'वर जायला पाहिजे असे स्वप्न बाळगून असतो. खूप जणांना आपण जगाची भ्रमंती करावी वाटते. कोविड १९ नंतर स्मिता हॉलिडेजच्या वतीने अंमलात आणलेल्या सेफ्टी फिचरवर प्रज्ञा गोरे यांनी इत्यंभूत माहिती दिली. आजवर तीन हजारांवर टूर्सचा अनुभव असलेल्या स्मिता हॉलिडेजच्या वतीने आमूलाग्र असे बदल घडवून आणले आहेत. 'एसएचपी' म्हणजेच सिस्टमॅटिक हॉलिडे प्लॅन हा नवा कन्सेप्ट स्मिता हॉलिडेजने आणला आहे. त्यानुसार दरमहा हजार रुपयांपासून पुढे स्मिता हॉलिडेजमध्ये जमा करून १२ महिन्यांनी चांगला टूर निवडू शकतो. भारतातील प्रमुख पर्यटन स्थळांसह परदेशातील स्थळांना भेटी देण्याचे कार्य तितक्याच नियोजनबद्ध पद्धतीने केले आहे. महाराष्ट्राला प्रमोट करतानाच स्मिता हॉलिडेज ऐतिहासिक औरंगाबाद शहराला सुद्धा प्रमोट करत आहे, असे नमूद केले. ५२ दरवाज्यांचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या औरंगाबाद शहरात सेफ्टी फिचरअंतर्गत ओपन बसच्या माध्यमातून शहराची भ्रमंती, पर्यटनस्थळांना भेटी, टेन्ट, स्पेशल गाड्या स्मिता हॉलिडेजने पर्यटन प्रेमींसाठी सज्ज केल्या असल्याची माहिती दिली. स्मिता हॉलिडेजच्या वतीने 'ॲडव्हांचर स्पोर्ट्स ॲक्टिव्हिटी' देखील करण्यात येते. विशेष म्हणजे इन्व्हेस्टमेंट आणि हॉलिडे टूरविषयक हे संवादसत्र खऱ्याअर्थी अभ्यासपूर्ण ठरले. स्मिता इन्व्हेस्टमेंट व स्मिता हॉलिडेजचे संचालक जयंत गोरे हे स्वतः याच क्षेत्रात कार्यरत असून सर्वसामान्यांना सहजपणे समजेल अशा पद्धतीने मान्यवरांशी संवाद साधला.

## सउदी येथूनही सहभाग

या फेसबुक लाइव्हमध्ये शिंदे-चव्हाण-गांधी कंपनीचे प्रमोटर सीए सचिन शिंदे यांनी देखील सहभाग घेतला. त्यांनी इन्व्हेस्टमेंटविषयी माहितीही दिली व स्मिता इन्व्हेस्टमेंटच्या कार्याचा गौरवही केला. याशिवाय सउदी येथून एका आंतरराष्ट्रीय कंपनीत मोठ्या पदावर कार्यरत असलेले श्रीरंग देशपांडे, सेवानिवृत्त प्राचार्य नंदकुमार राठी व सेवानिवृत्त शिक्षिका आशा कुलकर्णी यांनीही या संवादसत्रात सहभाग घेऊन प्रश्नांची उत्तरे मिळवली.

## पाचशे जणांना मिळणार नोकरीची संधी

करोना काळात मोठ्या प्रमाणावर नोकऱ्यांचे संकट पाहायला मिळत असताना स्मिता इन्व्हेस्टमेंट व स्मिता हॉलिडेजच्या वतीने येणाऱ्या काळात महाराष्ट्रभरात तब्बल पाचशे जणांना नव्याने नोकरीची संधी मिळवून दिली जाणार असल्याची घोषणा संचालक जयंत गोरे यांनी केली.